**तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंबनिवृत्तिवेतन मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखांस "एक विशेष बाब" म्हणून प्रत्यार्पित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०२०/प्र.क्र.२५/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून २०२०.

**शासन निर्णय -**

कोविड-१९ च्या प्रादुर्भावास अटकाव करण्याच्या हेतुने सामाजिक अंतर राखता यावे याकरिता सर्व शासकीय कार्यालयात कर्मचारीवृदांची उपस्थिती मर्यादित करण्यात आली आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे सेवानिवृत्त / मृत होणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन प्रकरणे अंतिम करण्यास विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. निवृत्तिवेतनधारकास/कुटुंब निवृत्तिवेतनधारकास नियमित निवृत्तिवेतन/कुटुंबनिवृत्तिवेतन देण्यास विलंब होणार असल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम १२६(६) व १४० नियमामध्ये अनुक्रमे तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन कार्यालय प्रमुख स्तरावर प्रथम ६ महिने व त्यानंतर लेखापरीक्षा अधिकाऱ्याच्या सल्ल्याने आणखी ६ महिनेपर्यंत मंजूर करण्याची तरतूद आहे. तथापि, कोविड-१९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे वेतन पडताळणी आणि महालेखापाल यांच्याकडून निवृत्तिवेतन प्राधिकारपत्राचे निर्गमन इत्यादी बाबींस विलंब होत आहे. सद्यस्थिती विचारात घेता,सेवानिवृत्ती प्रकरणे अंतिम होण्यास यापुढील कालावधीतदेखील आणखी विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ नुसार सेवानिवृत्त / मृत शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करावयाचे तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन हे पहिल्या ६ महिन्यांकरिता मंजूर करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांस आहेत. तथापि, उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, याद्वारे आता त्यापुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्याचे अधिकार एक विशेष

बाब म्हणून विभाग प्रमुखांकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत. एक वर्षानंतर मुदत वाढ दयावयाची झाल्यास लेखापरीक्षा अधिकाऱ्याच्या सल्ल्याने कार्यालय प्रमुखांनी पुढील ६ महिन्यांसाठी तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्याची कार्यवाही करावी. मात्र दीड वर्षाच्या कालावधीनंतरही तात्पुरते निवृत्तिवेतन /कुटुंबनिवृत्तिवेतन प्रकरणास मुदतवाढ दयावयाची झाल्यास अशी प्रकरणे वित्त विभागाकडे पाठविण्यात यावीत.

४. सदर अधिकारांचे प्रत्यार्पण हे तात्पुरत्या स्वरुपाचे असून ते दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत लागू राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२००६२५१६१५४४७४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

(इंद्रजित गोरे)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
३) मा.राज्यपालांचे सचिव.
४) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.
५) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
८) मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
९) प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१०) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१८) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
१९) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२०) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२१) सर्व विभागीय आयुक्त.
२२) सर्व जिल्हाधिकारी.
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२५) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
२६) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२७) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
२८) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२९) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३०) निवड नस्ती.

तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंबनिवृत्तिवेतन मंजूर करण्याचे अधिकार प्रत्यार्पित करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सेनिवे-२०२०/प्र.क्र.२५/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०७ मे, २०२१

**वाचा** : शासन निर्णय समक्रमांक दि. २५ जून, २०२०.

**प्रस्तावना -**

कोविड-१९ च्या प्रादुर्भावास अटकाव करण्याच्या हेतुने सर्व शासकीय कार्यालयात कर्मचारीवृदांची उपस्थिती मर्यादित करण्यात आल्याने उपरोक्त संदर्भाधीन दि. २५ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन हे दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत मंजूर करण्याचे अधिकार "एक विशेष बाब" म्हणून विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले होते. तथापि कोविड-१९ चा प्रादुर्भाव पुन्हा मोठया प्रमाणावर वाढत असल्यामुळे निवृत्तीवेतन प्रकरणे वेळीच अंतिम न झाल्यास, निवृत्ती वेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांची आर्थिक गैरसोय होऊ शकते. या सर्व बाबीचा विचार करता तात्पुरते निवृत्ती वेतन मंजूर करण्याबाबतच्या वित्त विभागाच्या दि. २५ जून, २०२० च्या शासन निर्णयानुसार केलेल्या अधिकार प्रत्यार्पणाला मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ नुसार सेवानिवृत्त / मृत शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करावयाचे तात्पुरते निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतन हे पहिल्या ६ महिंन्यांकरिता मंजुर करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखांस आहेत. तथापि, उपरोक्त परिस्थिती विचारात घेता, तात्पुरते निवृत्तिवेतन/कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करावयाचे अधिकार एक "विशेष बाब" म्हणून पहिले १२ महीने कार्यालय प्रमुख व त्यापुढील १२ महिन्याच्या कालावधीसाठी विभाग प्रमुखांकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत. २४ महिन्यानंतर मुदतवाढ द्यावयाची झाल्यास लेखा परीक्षा अधिकाऱ्याच्या सल्लयाने कार्यालय प्रमुखांनी पुढील ६ महिन्यासाठी तात्पूरते निवृत्तिवेतन मंजुर करण्याची कार्यावाही करावी. मात्र ३०

महिन्याच्या कालावधीनंतरही तात्पूरते निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनास मुदतवाढ द्यावयाची झाल्यास अशी प्रकरणे वित्त विभागाकडे पाठविण्यात यावी.

२. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये केलेल्या अधिकार प्रत्यार्पणांस अनुसरून कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख यांनी ६ महिन्याची मंजुरी यापूर्वीच दिली असल्यास आता त्यांना प्रत्येकी उर्वरित ६ महिन्याची मुदतवाढ देता येईल.

३. सदर अधिकाराचे प्रत्यार्पण हे तात्पुरत्या स्वरूपाचे असून ते दिनांक ३१ मार्च ,२०२२ पर्यंत लागू राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२१०५०७१५२२३०९००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, pseudonym=CAD826A943AA15444490C64B66C7EE464C4AD05A, serialNumber=D4994742192306FCC1DEA9AADD3810639506519FA6528919767898804E905A18, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2021.05.07 15:31:35 +05'30'

**( इंद्रजित गोरे )**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य.
३) मा.राज्यपालांचे सचिव.
४) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
५) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
७) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
८) मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
९) प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१०) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.

१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१७) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१८) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
१९) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२०) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.
२१) सर्व विभागीय आयुक्त.
२२) सर्व जिल्हाधिकारी.
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२५) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
२६) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२७) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
२८) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
२९) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
३०) निवड नस्ती.